विधानमंडळ सदस्यांना अर्थसंकल्प विषयक प्रकाशने बॅग ऐवजी संकेतस्थळ,/टॅबलेट/पेनड्राईव्ह यावर उपलब्ध करणे संदर्भात विचार विनिमय करण्यासाठी समिती गठित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्र. विसआ-२०१६/प्र.क्र. १०४/अर्थ-३.
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १९ जानेवारी, २०१८

पहा :- १) शासन निर्णय क्र. विसआ-२०१६/प्र.क्र.१०४/अर्थ-३, दिनांक १७ सप्टेंबर, २०१६, दि. १६ जानेवारी, २०१७ व दि. १९ ऑगस्ट,२०१७.

प्रस्तावना:-

संदर्भाधिन शासन निर्णयान्वये विधानमंडळ सदस्यांना अर्थसंकल्प विषयक प्रकाशने बॅगे ऐवजी संकेतस्थळ/टॅबलेट/पेन ड्राईव्ह यावर उपलब्ध करणे संदर्भात विचार विनिमय करण्यासाठी मा. मंत्री (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली सर्वपक्षीय समिती संदर्भाधीन दि. १७ सप्टेंबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये गठित करण्यात आली असून सदर समितीचा कार्यकाल डिसेंबर, २०१७ च्या हिवाळी अधिवेशनापर्यंत वाढविण्यात आला आहे. यासंदर्भात सदर सर्व पक्षीय समितीची बैठक दि. २८ सप्टेंबर, २०१७ रोजी झाली असून सदर बैठकीत विविध मुद्यांच्या अनुषंगाने चर्चा झाली असून त्यामध्ये समितीने इतर राज्यांची माहिती, यापोटी येणाऱ्या खर्चाची अंदाजित किंमत, संगणकीय प्रणाली विकसीत करणे इत्यादी बाबींसंदर्भात माहिती घेण्याचे निदेश देण्यात आले आहेत. त्याअनुषंगाने याबाबतची माहिती संकलित करण्यात येत असून यास आणखी कालावधी लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे या समितीचा कार्यकाल वाढविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन निर्णय:-

उपरोक्त वस्तूस्थिती लक्षात घेता, शासन या आदेशाव्दारे विधानमंडळात अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर विधानमंडळ सदस्यांना अर्थसंकल्प विषयक प्रकाशने बॅगे ऐवजी संकेतस्थळ/टॅबलेट/पेन ड्राईव्ह यावर उपलब्ध करणे संदर्भात विचार विनिमय करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या सर्वपक्षीय समितीस दि. ३१ मार्च, २०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. सदर गठित समितीची कार्यकक्षा व इतर अटी व शर्ती यामध्ये कोणताही बदल नसून त्या समक्रमांकीत दिनांक १७ सप्टेंबर, २०१६ च्या शासन निर्णयप्रमाणे राहतील.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०११९१५५०४०९६०५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vasant K. Patil

Digitally signed by Vasant K. Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=FINANCE DEPT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=16a60323ef3beff915e7cf13b9836a7df2ad6df610965aab153a71bdb81c36c1, cn=Vasant K. Patil
Date: 2018.01.19 15:55:59 +05'30'

(व.कृ.पाटील)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा/विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

२) मा. राज्यपालांचे सचिव,
३) मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव,
४) सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५) सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) प्रधान महालेखापाल (लेखा परिक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
७) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
८) प्रधान महालेखापाल (लेखा परिक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
९) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, नागपूर.
१०) प्रधान सचिव/सचिव, विधानसभा/विधानपरिषद, महाराष्ट्र विधीमंडळ सविवालय, मुंबई.
११) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
१२) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१३) सर्व कार्यासने, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.